**निधी वितरण- सन २०२६-२७.**
महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना लेखाशिर्ष २२१० के ६८७ (SCP) ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत अंगीकृत रुग्णालयांचे दावे अदा करण्यासाठी रु. ८५.०० कोटी इतका निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
शासन निर्णय क्रमांक:- मफ़ुयो-२०२६/प्र.क्र.७६/MJPJAY&AB-PMJAY/E- १६६५०२०
गो.ते. रुग्णालय संकुल, १० मजला,
नवीन मंत्रालय, मुंबई - ४०० ००१
दिनांक: ९ सप्टेंबर`, २०२६

**वाचा :-**

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मफुयो-२०२३/प्र.क्र.१६०/आरोग्य-६, दि.२८ जुलै, २०२३
२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. लेखाप्र-२०२४/प्र.क्र.२१७/LB/आरोग्य-६,दि. २० फेब्रुवारी, २०२५
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०९ एप्रिल, २०२६
४) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७ मे, २०२६
५) राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई यांचे पत्र क्र. राआहसो/लेखा/प्र. अ./१२३०१/१०७१/२०२६, दि.१५ मे,२०२६
६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.बीजीटी-२०२५/प्रक्र.१०५/अर्थसंकल्प (विघयो),दि. १४ ऑगस्ट,२०२६

**प्रस्तावना :-**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजनांची दि. १ जुलै, २०२४ पासून विस्तारित स्वरूपात अंमलबजावणी राज्य शासनाद्वारे राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत सुरू आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी योजनेंतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीपैकी अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांसाठी अंगीकृत रुग्णालयांचे दावे अदा करण्याकरिता राज्य आरोग्य हमी सोसायटीस तरतूद उपलब्ध करून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:-**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची अंमलबजावणी राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत होत असल्यामुळे योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांचे दावे अदा करण्याकरिता सन २०२६-२७ साठी २२१० के ६८७ (SCP), ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पित तरतुदीपैकी रु. ८५.०० कोटी एवढा सशर्त निधी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या ८४४३- नागरी ठेवी, १०६ वैयक्तिक लेखा, (००) (०२) आभासी वैयक्तिक ठेव लेखा खाते (VPDA) यामध्ये, आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांच्या नावे सुपूर्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. यावरील खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत खर्ची टाकण्यात यावा.

**मागणी क्र. एन-०३**

| | | |
|---|---|---|
| २२१० | - | वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य |
| ०१ | - | नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा |

| | | |
|---|---|---|
| ७८९ | - | अनुसूचित जाती उप-योजना |
| (०१) | - | अनुसूचित जाती घटक कार्यक्रमांतर्गत योजना |
| (०१) (०६) | - | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना-हमी तत्त्वावर राबविणे (राज्य योजना) (कार्यक्रम) |
| २२१० के ६८७ | - | ३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) |

**३.** शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरीत करण्यात येत आहे:-

१) सदरचा निधी हा विस्तारीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभार्थ्यांच्या आरोग्य संरक्षणापोटी रुग्णालयांच्या दाव्यांच्या अदायगीसाठी करण्यात यावा.

२) सदरचा निधी योजनेंतर्गत अंगीकृत रुग्णालयांचे दावे अदा केल्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र विहीत नमुन्यात आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना सादर करावे.

४. राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई या कार्यालयास निधीचा विनियोग करण्यासाठी “आभासी वैयक्तिक ठेव लेखा (Virtual Personal Deposit Account-VPDA)” ही व्यवस्था संदर्भ क्र. ०२ येथील दिनांक २०.०२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये लागू केलेली आहे. आभासी वैयक्तिक ठेव लेखा प्रशासक यांनी वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.११०/२०२३/कोषा प्रशा-५, दिनांक १४.०२.२०२४ व संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दिनांक २०.०२.२०२५ मधील तरतुदींचे तंतोतंत पालन करावे. सदर अनुदानाचे देयक अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांच्याकडे सादर करण्यासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे आहरण व संवितरण अधिकारी तसेच सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी असतील.

**५.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ ई-ऑफ़िस क्र.१६६५०२० नोट क्र.५१-५४, दि.३०.०७.२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय क्र. बीजीटी-२०२५/प्रक्र.१०५/ अर्थसंकल्प (विघयो),दि. १४ ऑगस्ट,२०२६ मधील अटीशर्ती व मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

**६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९०९११४६१५६९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL
VITHALRAO
SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
ou=Public Health Department,
2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57,
cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.09.09 13:20:19 +05'30'

**(अनिल वि.सावरे)**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल, लेखा परीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता, मुंबई.

२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई
६. संचालक, (प्राथमिक ) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
७. संचालक, (रुग्णालये ) आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई
८. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, पुणे.
९. प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई. ( ३ प्रती)
१०. नियोजन विभाग (कार्यासन१४७२), मंत्रालय, मुंबई
११. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, अर्थसंकल्प कार्यासन मंत्रालय,मुंबई.
१२. वित्त विभाग, कार्यासन - व्यय -१३/अर्थसंकल्प-९, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. अर्थसंकल्प शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती.